सातारा, शुक्रवार, १८ ऑक्टोबर २०१९

सकाळ

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# 'डी.पी.'च्या १५ जणांची 'कॅम्पस'मधून निवड

## टाटा कन्सल्टन्सीतर्फे 'वायसी'त आयोजन



**कोरेगाव : टाटा कन्सल्टन्सीच्या कॅम्पस मुलाखतीतून निवड झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत व इतर.**

**सातारा, ता. १७ :** यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा येथे झालेल्या टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसच्या (टीसीएस) कॅम्पस मुलाखतीत कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयातील १५ विद्यार्थ्यांची डेटा प्रोसेसर व ॲनालायझर या पदावर निवड झाली आहे. या पदासाठी 'टीसीएस'तर्फे देशभरातून ऑनलाइन परीक्षा घेऊन व मुलाखतीतून विद्यार्थ्यांची निवड केली जाते. त्यातून निवडलेल्या सातारा विभागातील ८१ विद्यार्थ्यांपैकी हे १५ विद्यार्थी आहेत.

हे सर्व विद्यार्थी ग्रामीण भागातील व अतिशय गरीब कौटुंबिक परिस्थितीतील असून, त्यांच्या निवडीने या विद्यार्थ्यांच्या पालकांमधून अत्यंत आनंद व समाधान व्यक्त करण्यात येत आहे. या यशासाठी महाविद्यालयाच्या प्लेसमेंट व स्कील डेव्हलपमेंट सेलमार्फत विशेष प्रशिक्षण दिले गेले.

या सर्व विद्यार्थ्यांचे रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, सचिव डॉ. भाऊसाहेब कराळे, सहसचिव व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत, महाविद्यालयातील सर्व सेवक-विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले. त्यासाठी सेलचे समन्वयक डॉ. एन. डी. निकम व प्रा. एस. यु. कसगावडे यांनी परिश्रम घेतले.